**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १६७/१९८८ मधील निशाणी ४१२ खालील आदेश.</u>**

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांचे वारसांना रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

२. प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक ०२/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. वादीने मुदतीत त्यांचे वारस रेकॉर्डवर घेतलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रस्तुतचे प्रकरण हे अबेट झालेले आहे. वादीने प्रतिवादी क्र. ४ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास मुद्दामहुन विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्र. ४ चा मृत्युउतारा व आवश्यक माहीती वेळेत न मिळाल्याने प्रतिवादी क्र. ४ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला आहे. विलंब माफ केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट विलंब माफ न केल्यास वादीचे नुकसान होईल. त्यामुळे वादीतर्फे प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळावा अशी विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी ४१५ वर त्यांचे म्हणणे दाखल केले व अर्जातील कथनांना तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे. प्रतिवादींच्या मते अर्जात नमूद केलेले कारण हे खोटे व लबाडीचे आहे. प्रतिवादी क्र. ४ हा वादीचा नातेवाईक आहे. वादीला प्रतिवादी क्र. ४ च्या मृत्युची माहीती पहिल्यापासुन होती. प्रतिवादी क्र. ४ च्या मृत्युनंतर सर्व धार्मीक विधीमध्ये वादीने सहभाग घेतला आहे. त्यामुळे अर्जात नमूद केलेले कारण हे योग्य व संयुक्तीक नाही. वादीच्या निष्काळजीपणामुळे विलंब झालेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली.

४. प्रतिवादी क्र. ४ च्या वारसांनी सदर अर्ज मंजुर करण्यास हरकत नसल्याचे

कथन केलेले आहे.

५. अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचा दावा हा मालकी घोषीत होण्यासाठी तसेच निरंतर ताकीदीसाठी व वैकल्पीकरित्या ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादीने स्वतःचे शपथपत्र दाखल केलेले आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोणातुन दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस यांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. त्यामुळे वाद मुद्यांचे निराकरण गुणवत्तेवर होणार आहे. मात्र तसे न केल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ न केल्यास न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायोच्चीत वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2022.09.15 14:54:01 +0530

कोरेगाव.
दि. १४/०९/२०२२

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.